# उपराजधानीत साडेसहा हजार क्षयरुग्ण

## मृत्यूदर कमी करण्यात मात्र महापालिकेला यश

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** शहरात १ जानेवारी २०२४ ते ५ डिसेंबर २०२४ दरम्यानच्या क्षयरोगाचे तब्बल ६ हजार ६६२ रुग्ण आढळले. परंतु या आजाराचा मृत्यूदर मात्र कमी करण्यात महापालिकेला यश आले. शहरात महापालिकेकडून ७ डिसेंबरपासून शंभर दिवसीय क्षयरोग शोध मोहिमेचा शुभारंभ केला जात आहे. त्यानिमित्त घेतलेला हा आढावा.

शहरी भागात १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान क्षयरोगाचे ८ हजार २०० रुग्ण शोधण्याचे लक्ष्य देण्यात आले होते. त्यापैकी ७ हजार ६१४ रुग्ण शोधण्यात यश मिळाले. २०२४ मध्ये महापालिकेच्या आरोग्य विभागाला ८ हजार ५० रुग्ण शोधण्याचे लक्ष्य दिले गेले होते. त्यापैकी ६ हजार ६६२ रुग्ण शोधण्यात यश आले. शहरात २०२२ मध्ये क्षयरोगामुळे ३९५ रुग्णांचा मृत्यू झाला. हे मृत्यू प्रमाण २०२३ मध्ये २४८ रुग्णांवर आले. यंदा ही संख्या स्पष्ट झाली नसली तरी त्याहून कमी असल्याचा महापालिकेच्या आरोग्य विभागाचा दावा आहे.

> “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०२२ मध्ये क्षयरोग मुक्त भारताची हाक देत विविध उपक्रम सुरू केले. त्यानुसार महापालिकेकडून रुग्णांना २०२३ मध्ये रेशन किट्स वाटण्यात आल्या. या मोहिमेमुळे शहरात क्षयरोगाचे रुग्ण व मृत्यू कमी झालेले दिसत आहेत.”
>
> **- डॉ. शिल्पा जिचकार,** शहर क्षयरोग अधिकारी, महापालिका.

### शोध मोहिमेचा शुभारंभ आजपासून

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाअंतर्गत महापालिकेच्या वतीने शहरामध्ये १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेचा शुभारंभ शनिवारी (७ डिसेंबर) सदर पोलीस स्टेशनजवळील जिल्हा नियोजन भवन येथून सकाळी १०.३० वाजता होणार आहे. ही मोहीम देशभरातील निवडक ३४७ जिल्ह्यांमध्ये तसेच महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार असून त्यामध्ये नागपूर शहराची निवड करण्यात आली आहे.

### या गोष्टींवर लक्ष....

७ डिसेंबर २०२४ पासून शहरातील क्षयरुग्ण शोधून त्यांच्यावर उपचार सुरू करणे, क्षय रुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, नवीन क्षयरुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित व अतिजोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरवणे, क्षयरोग विषयी जनजागृती करणे, समाजामधील क्षयरोग विषयी जनजागृती करणे व सामाजिक कलंक कमी करण्यासाठी उपक्रम राबवणे, जिल्ह्यातील संमती दिलेल्या क्षयरुग्णांना पंतप्रधान क्षयमुक्त भारत अभियानाअंतर्गत निक्षय मित्र यांच्याकडून पोषण आहार किटचे वाटप करणे आदी कार्य केली जाणार आहेत, अशी माहिती नागपूर महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी दिली.

# कोराडीत बिबट्या जेरबंद

## चार महिन्यांपासून विद्युत विहारमध्ये वास्तव्य

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**नागपूर :** कोराडी येथील महानिर्मिती विभागाच्या विद्युत विहार वसाहतीत फिरणाऱ्या बिबट्याला सेमिनरी हिल्सवरील ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राच्या चमूने जेरबंद केले. गेल्या चार महिन्यांपासून हा बिबट या वसाहतीत होता. रात्रीच्यावेळी त्याचा वसाहतीतील वावर वाढला होता.

महानिर्मितीच्या वसाहतीत ठाण मांडून बसलेल्या बिबट्याने कोणत्याही नागरिकावर हल्ला केला नव्हता. मात्र, विद्युत विहार प्राथमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या भिंतीवर हा बिबट सतत येऊन बसत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. सायंकाळनंतर घराबाहेर पडण्यासही नागरिक घाबरत होते. वनविभागाचे पथकही बिबट्यावर लक्ष ठेवून होते. मात्र, या पथकालाही बिबट गवसला नाही. दरम्यान, सेमिनरी हिल्सवरील प्रादेशिक वनविभागाच्या अखत्यारितील ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राच्या चमूने राज्य वन्यजीव मंडळाचे माजी सदस्य कुंदन हाते यांच्या नेतृत्वात गुरुवार, पाच डिसेंबरला रात्री आठ वाजता बिबट्याच्या संभाव्य भेटीच्या ठिकाणी पिंजरा लावला. पिंजऱ्यात बिबट्यासाठी शिकार ठेवण्यात आलेली. पिंजऱ्यात प्रवेश करताच बिबट्याला जेरबंद करण्यात आले. त्यानंतर ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राच्या चमूने त्याला तात्काळ केंद्रात नेले. याठिकाणी त्याची प्राथमिक तपासणी करण्यात आली. त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी वैद्यकीय तपासणीनंतर तो शारीरिकदृष्ट्या निरोगी असल्याचे प्रमाणपत्र दिले. त्याला शुक्रवारी नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. हा बिबट गेल्या सहा महिन्यांपासून कोराडीमागील जंगलात फिरताना दिसत होता. गेल्या चार महिन्यापासून तो महानिर्मितीच्या वसाहतीत देखील दिसत होता. त्याला जेरबंद करून जंगलात सोडल्यामुळे कोराडी विद्युत विहार वसाहतीतील नागरिकांनी आनंद व्यक्त केला. ही कारवाई प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक डॉ. भारत सिंग हाडा यांच्या मार्गदर्शनात डॉ. राजेश फुलसुंगे, प्रतीक घाटे, हरीश निमकर, वनरक्षक बंडू मंगर, विलास मंगर, चेतन बारस्कर, आशीष महल्ले, सौरभ मंगर, खेमराज नेवारे यांनी यशस्वी केली.

# वाठोडा परिसरात पोलीस अधिकाऱ्याला मारहाण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका पोलीस अधिकाऱ्याला अपघातस्थळी एका नागरिकाकडून मारहाण करण्यात आली.

टीचर कॉलनी भागात गुरुवारी मध्यरात्री अपघात घडला. त्यात खोल खड्ड्यात पडून अश्विन गेडाम नावाच्या व्यक्तीचा मृत्यू झाला. घटनेची माहिती कळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले.

# सारस पक्ष्यांचे पाचपैकी तीन घरटे उद्ध्वस्त

## उच्च न्यायालयाने वनविभागाला मागितले स्पष्टीकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** विलुप्त होत असलेल्या सारस संवर्धनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या पुढाकाराने वनविभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र गोंदिया जिल्ह्यातील सारस पक्ष्यांचे पाचपैकी तीन घरटे मानवी हस्तक्षेपामुळे उद्ध्वस्त झाल्यामुळे उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करत वनविभागाला स्पष्टीकरण देण्याचे आदेश दिले.

सारस पक्ष्याच्या संवर्धनासाठी उच्च न्यायालयाने स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेतली आहे. याचिकेवर शुक्रवारी न्या.नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. भंडारा, गोंदिया तसेच मध्यप्रदेशमधील बालाघाट जिल्ह्यात सारस पक्ष्याचे अधिवास असून त्यांची संख्या वेगाने कमी होत आहे. सारस पक्ष्याच्या संवर्धनासाठी उच्च न्यायालयाकडून वारंवार आदेश दिल्यामुळे संवर्धनासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहे. गोंदिया जिल्ह्यातील तीन घरटी उदवस्त झाल्याचे न्यायालयीन मित्र ॲड. राधिका बजाज यांनी न्यायालयाच्या निदर्शनात आणून दिले. सारस पक्ष्याच्या घरट्यांच्या जवळ मानवी हस्तक्षेप होत असल्यामुळे हा प्रकार घडला असल्याची तक्रार त्यांनी केली. न्यायालयाने याप्रकरणी वनविभागाला स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले. याचिकेवर पुढील सुनावणी जानेवारी महिन्यात होईल.

### जिओ टॅगिंगला सुरुवात

सारसच्या संवर्धनासाठी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या (बीएनएचएस) वतीने जिओ टॅगिंगच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. विदर्भातील सारस पक्ष्यांची ठिकाण कळावे आणि त्यांच्या संवर्धनात मदत व्हाही या हेतून उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. बीएनएचएस संस्थेतील ज्येष्ठ शास्त्रज्ञ यांच्या मार्गदर्शनात नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात एका वयस्क सारसची जिओ टॅगिंग यशस्वीपणे पार पडली.

# विधानमंडळ सचिवालय १२ पासून नागपुरात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात १६ डिसेंबरपासून होण्याची शक्यता असून त्यासाठी विधानमंडळ सचिवालयाचे काम १२ डिसेंबरपासून नागपुरात सुरू केले जाणार आहे. सरकारने ७ आणि ८ डिसेंबरला मुंबईत विशेष अधिवेशन बोलावले आहे. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षांची निवड करण्यात येईल. तसेच आमदारांचा शपथविधीही होणार आहे.

यावेळी हिवाळी अधिवेशनाच्या तारखेची घोषणा केली जाईल. परंतु प्रशासनाने नागपूर हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होईल हे गृहीत धरून तयारीला वेग दिला आहे. विधानसभा आणि विधान परिषदेचे सभागृह सुसज्ज केले जात आहेत. मंत्री आणि अधिकाऱ्यांचे कक्ष नीटनेटके केले जात आहेत. तसेच सर्व मंत्री, आमदार, सचिवालयाचे अधिकारी, कर्मचारी यांची निवासाची व्यवस्था तातडीने करण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत.

# शहरात आठ ठिकाणी कचरा हस्तांतरण केंद्र

## घरातला कचरा आता थेट क्षेपणभूमीत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** महापालिकेकडून शहरात आठ कचरा हस्तांतरण केंद्र (गारबेज ट्रान्सफर स्टेशन)ची निर्मिती करण्यात येत आहे. ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा संकलन होते अशा ठिकाणी हे केंद्र उभारण्यात येत आहे. घरातला कचरा आता रस्त्यावर न येता तो थेट डम्पिंग यार्डमध्ये जाईल.

कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास होणारा उशीर आणि स्वच्छतेच्या दर्जामध्ये झालेली घसरण बघता हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. प्रत्येक ट्रान्सफर स्टेशनमध्ये एकाहून अधिक झोनचा कचरा संकलित होणार आहे. महापालिकेने या केंद्रांसाठी निर्धारित केलेल्या जागांमध्ये मुर्गा बाजार, कमाल बाजार, मंगळवारी बाजार, सुदामनगरी, बुधवार बाजार, चुनाभट्टी, बस्तरवाडी आणि मोरभवनच्या मागील भागांचा समावेश आहे. या जागा अंतिम करण्यापूर्वी त्यावर बराच विचार करण्यात आला.

जागा निश्चित करण्याआधी त्याचा आसपासच्या रहिवासी वस्त्यांना त्रास होणार नाही, ही बाब विचारात घेण्यात आली. त्यामुळे ही केंद्रे सुरू करण्यापूर्वी स्वच्छतेपासून इतर सर्व प्रकारची काळजी घेण्यात येईल. या नव्या प्रणालीत संकलित कचरा उघड्यावर व जमिनीवर टाकण्यात येणार नाही. नव्या केंद्रांमध्ये वाहनातून थेट वाहनात कचरा टाकण्यात येईल. जेणेकरून आसपासचा परिसर स्वच्छ राहील, अशी माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. गजेंद्र महल्ले यांनी दिली. यासाठी महापालिकेने ३० कॉम्पॅक्टर्स घेतले असून ते प्रत्येक केंद्रांवर तीन असे देण्यात आले आहेत. या कॉम्पॅक्टर्समध्ये घरोघरी संकलित कचरा गोळा करून भांडेवाडी येथे नेण्यात येणार आहे. या पूर्णपणे यांत्रिकी प्रणालीवर आधारित तंत्रज्ञानामुळे कुठेही कचरा पडणार नाही. या नव्या केंद्रांची निर्मिती करताना महापालिकेला नागरिकांच्या विरोधालाही तोंड द्यावे लागत आहे. दरम्यान, शहरातील कचरा व्यवस्थापन योग्य पद्धतीने करायचे असेल तर ही केंद्रे अत्यंत आवश्यक असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. महापालिकेकडून उभारण्यात येणाऱ्या या नव्या केंद्रांवर कचरा मोजण्यासाठी आवश्यक मोजमाप प्रणाली, आरआरआर केंद्र, गार्ड रूम, कर्मचाऱ्यांसाठी स्वच्छतागृह आदी सुविधा असतील.

महिनाभरात केंद्रे सुरू होण्याची शक्यता आहे. या केंद्रांचा वापर करण्यासाठी एजी एन्व्हॉयरो आणि बीव्हीजी इंडिया या दोन्ही कंपन्यांना भाडे द्यावे लागणार आहे.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**TENDER NOTICE**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These tender can be submitted by the registered contractors of NMC. The Terms and conditions of tenders are available in tender form. The sale and purchase of Tender form at E.E. (DPDC) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| Tender No | Name of Work | BOQ Cost Rs. |
|---|---|---|
| 1-2024 | Construction of c.c. road from plot no. 5 to 1 front of K-sq. at Shri Sant Sai Krupa society and from plot no. 1 to plot no. 7 Ankita App. Dobi nagar society, Swami Swarupanandan society, Narendra nagar in p. no. 35 | 817656/- |
| 2 -2024 | Construction of c.c. road from plot no. 13 to 16 and from plot no. 12 to plot no.21 front of K-sq. at Shri Sant Sai Krupa society Narendra nagar in p. no. 35 | 818143/- |

**Note :- 1)** Cost of Blank Tender form each Rs. 590/-, EMD : Rs. 8500/-, Time Limit : 3 Months, Class of Contractor : I to VII. **2)** Tender sale & submission start date : 05.12.2024. **3)** Tender submission date/sales end date 19.12..2024 up to 5.00 pm. **4)** Date of opening of Tender (if possible) 20.12.2023 up to 5.00 pm. **5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in uploaded tender document.

**Advt No. 750 PR Date 06.12.2024**

**Executive Engineer (Slum)**
**NMC, Nagpur**

P/N/24/750



**pnb Housing Finance Limited** Ghar Ki Baat

**परिशिष्ट - IV-अ - अचल मालमत्तांची ई-लिलाव विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

नोंदणीकृत कार्यालयः नववा मजला, अंतरिक्ष भवन, 22, के.जी.मार्ग, नवी दिल्ली-110001 फोनः 011-23357171, 23357172, 23705414, वेबसाईटः www.pnbhousing.com

**शाखा कार्यालयःसदनिका क्र. 301, तिसरा मजला, प्लॉट क्र. 1 आणि 2, गुप्ता हाऊस, रवींद्रनाथ टागोर मार्ग, सिव्हिल लाईन्स, नागपूर- 440001**

याद्वारे खाली स्तंभ क्र.-अ मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण/भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ-ड मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** (पीएनबी एचएफएल)/सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयांनी रचनात्मक/प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ-क मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे''** आणि **''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल.

याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार/गहाणदार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार/गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्यूपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

| कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस (अ) | मागणी केलेली रक्कम आणि दिनांक (ब) | ताब्याचे स्वरूप (क) | तारण मालमत्तांचे वर्णन (डी) | आरक्षित किंमत (ई) | बयाणा रक्कम (आरक्षित किमतीच्या 10%) (एफ) | बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी) | बोली वृद्धी रक्कम (एच) | पाहणी दिनांक आणि वेळ (आय) | लिलाव दिनांक आणि वेळ (जे) | ज्ञात बोजे/ न्यायालयीन खटले असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **HOU/NAG/0319/660157, सतीश राजू वाघमारे/प्रियंका सतीश वाघमारे/जयेश कन्स्ट्रक्शन, शा.का.: नागपूर** | रु. 24,16,005.96 आणि 17.08.2022 | प्रत्यक्ष ताबा | सदनिका क्र. 201, दूसरा मजला, व्यंकटेश एन्क्लेव्ह, प्लॉट क्र. 300, ख.क्र. 90, 93/3, **मौजा बिनाकी, नागपूर, महाराष्ट्र - 440002** | रु. 21,79,000 | रु. 2,17,900 | 23-12-2024 | रु. 10,000 | 18-12-2024 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | 24-12-2024 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 वाजेपर्यंत | *निरंक / ज्ञात नाही |
| **NHL/NAG/0517/391764 आणि HOU/NAG/0517/390229, राजेंद्र कृष्णाराव चौधरी / मंजूषा राजेंद्र चौधरी, शा.का.: नागपूर** | रु. 7,88,664.96 + रु. 18,40,291.19 आणि 25.11.2019 | प्रत्यक्ष ताबा | सदनिका क्र. 301, तिसरा मजला, प्लॉट क्र. 49, 50,51, सिटी सर्वे क्र. 239, शीट क्र. 458/56, ख.क्र. 79/1, प.ह.क्र. 34, वॉर्ड क्र. 20, राजाराम अपार्टमेंट, राहुल नगर, मौजा दिघोरी, जनता को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, शिव मंदिराजवळ, उमरेड रोड, **नागपूर, महाराष्ट्र - 440009** | रु. 20,88,000 | रु. 2,08,800 | 23-12-2024 | रु. 10,000 | 12-12-2024 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00 वाजेपर्यंत | 24-12-2024 रोजी दु. 02:00 ते दु. 03:00 वाजेपर्यंत | *निरंक / ज्ञात नाही |

***सोबत भरण्याच्या व/वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ क्र.-के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल/अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे/दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने/बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार/बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी.**

1. आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता/अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल/ पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही व त्याची स्थिति स्तंभ-के मध्ये नमूद करण्यात आली आहे. 2. संभाव्य खरेदीदारांनी/बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ-के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया/आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथपर्यंतच मर्यादित नसून त्यांनी निविदा/बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदारास बोली प्रपत्रासोबत सदर लिलावाच्या अटी व शर्तींवर स्वाक्षरी करावी लागेल. 3. कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार/खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल, अन्यथा मालमत्ता/अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **4. प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरयाणा, 122003 येथे कॉर्पोरेट कार्यालय असलेल्या मे. सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. वेबसाईटः www.bankeauctions.comमालमत्तेच्या पाहणीशी किंवा बोली दस्तावेज प्राप्त करण्याशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी आणि कोणत्याही चौकशीसाठी किंवा नोंदणीसाठी आपण पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत अधिकारी मनोज कुमार सोलंकीटोल फ्री क्रमांक 18001208800, इमेलः auction@pnbhousing.com वर संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com वर भेट द्यावी.**

स्थानः नागपूर, दिनांकः 06-12-2024

स्वा/- प्राधिकृत अधिकारी, मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड



**पंजाब नैशनल बैंक punjab national bank** ...the name you can BANK upon !

**सर्कल सस्त्र सेंटर**
**पीएनबी हाऊस, किंग्सवे, नागपूर - 440001**
**फोन:** 0712- 6603753, 6630484 । **ई-मेल:** cs6795@pnb.co.in

**प्रत्यक्ष ताबा सुचना**
**(चल/ अचल संपत्ती करिता)**

खालील हस्ताक्षर कर्ता हे पंजाब नॅशनल बँकेचे अधिकृत अधिकारी असुन त्यांनी सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅससेटस् अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्यूरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 आणि सह वाचल्या जाणाऱ्या सिक्यूरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट नियम 2002 च्या कलम 13 चे नियम 3 अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन संबंधित कर्जदारांना सूचित करण्यात येते की, खालील लिहिलेल्या तारखेला मागणी सूचना दिली होती त्या सूचनेत नमूद केलेल्या रकमेची उक्त सूचना प्राप्त होणाऱ्या तारखेपासून 60 दिवसाच्या आत परतफेड करण्यास सांगितले होते/नोटीस प्राप्त झाल्याच्या तारखेपासून कर्जदार / जमानतदार रकमेची परतफेड करण्यास अपयशी ठरल्याने कर्जदार / जमानतदार व सर्व सामान्य जनतेला याव्दारे सूचना देण्यात येते की खालील हस्ताक्षर कर्ता यांनी उपरोक्त नियमाचा 8 सह वाचल्या जाणाऱ्या उपरोक्त कायद्याचा कलम 13 (4) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन यात खालील वर्णन केलेल्या संपत्तीचा **प्रत्यक्ष ताबा** प्रत्येकी खात्यामध्ये दिलेल्या तारखेला घेतलेला आहे.

सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या बाबतीत सरफेसी अधिनियमाच्या कलम 13 मधील उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कर्जदाराचे लक्ष निमंत्रित केले जात आहे.

विशेष करुन कर्जदार / जमानतदार तसेच आम जनतेला याव्दारा वरील संपतीच्या विषयी काहीही घेणे न करण्याकरीता जागृत केले जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रकमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे पंजाब नॅशनल बँक, व्याज सह इतर प्रभाराधिन राहिल.

सुरक्षित मालमत्तेची पुर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या बाबतीत सरफेसी अधिनियमाच्या कलम 13 मधिल उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कर्जदार/जमानतदार/ गहाणदाराचे लक्ष निमंत्रीत केले जात आहे.

| अ. क्र. | शाखेचे नाव | कर्जदार आणि गहाणदाराचे नाव | मालमत्तेचा मालक | गहाण ठेवलेल्या चल/ अचल संपत्तीचे तपशील | डिमांड नोटीस तारीख | ताबा घेण्याची तारीख (प्रत्यक्ष) | कर्जाची बकाया रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | हिंगणघाट | **मेसर्स किशन अॅग्रो इंडस्ट्रीज त्यांच्या द्वारा प्रोप्रा. श्री. नितीन किशनचंद मोटवानी जमानतदार : 1) श्रीमती माया किशनचंद मोटवानी 2) श्री.गिरीश देवनदास मोटवानी 3) श्री. देवनदास रोहंदमल मोटवानी** | **श्री. नितीन किशनचंद मोटवानी** | 1. सर्व भाग आणि तुकडा असलेले संपत्ती म्हणजे गैरकृषिक प्लॉट असलेले प्लॉट नं. 1, क्षेत्रफळ 6222.00 चौ.मी. आणि प्लॉट नं.2 चे क्षेत्रफळ 2911.57 चौ.मी. संपूर्ण भाग आणि तुकडा वळवलेले शेत सर्व्हे नं. 173/2 (एकुण क्षेत्रफळ एरीया 19600.00 चौ.मी.) औद्योगिक वापरासाठी वळवलेले आदेश दिनांक 18/07/2016 असलेले महसुल प्रकरण क्र. 10/एनएपी-34/15-16 आणि किशन अॅग्रो इंडस्ट्रीज नावानी प्लॉट नं. 1 आणि खुला प्लॉट नं. 2 वरील उभी असलेले मौजा अंजनगाव, मौजा नं. 11, पी.सी.नं. 6, तहसिल हिंगणघाट, जिल्हा वर्धा. **प्लॉटची चर्तुसिमा खालीलप्रमाणे : पूर्व** - मोकळी जमीन आणि बी झोन, **पश्चिम** - बी झोन आणि एफएस नं. 172, **उत्तर** - एफएस नं. 173/2, **दक्षिण** - बीट अंजनगाव. | 14/08/2024 | 05/12/2024 | रू. 18,69,18,438.28 13/08/2024 रोजी + व्याज आणि इतर अतिरिक्त शुल्क |
| | | | **मेसर्स किशन अॅग्रो इंडस्ट्रीज** | 2. संपूर्ण चल संपत्ती म्हणजें बोजा नसलेले यंत्रसामंग्री (स्वतंत्र असलेले मुदत कर्ज) 1. इलेक्ट्रिकल पॉवर ट्रान्सफॉर्मर 350 KV,बसवण्याची व्यवस्था, केबल, मीटर रूम, कंट्रोल पॅनल, विजेची व्यवस्था. 2. एअर कंप्रेसर मेक-इंगरसोल रॅड पाइपिंग व्यवस्थेसह. 3. बॉयलर पाईपिंगसह, वाल्व , चिमणी. 4. 50 टी वजनाचा पूल आणि त्याची रचना. 5. सॉर्टेक्स युनिट मशीन - बनवा कोमा मोटरसह, गियर व्यवस्था, ड्राइव्ह, चुंबक व्यवस्था नियंत्रण पॅनेल. 6. भिन्न आकारासह लिफ्ट 7. वरम लांबी 12*9' 8. हॉपर/टॅक/चेंबर, 9. रोल मशीन, 10. हायड्रोलिक संलग्नक असलेले ट्रॅक्टर 11. डेस्कटॉप. 12. एअर कंडिशनर, 13. फर्निचर आणि फिक्स्चर, 14. सुटे- गियर मोटर, लिफ्ट, कपलिंग, इलेक्ट्रिकल क्सेसरीज. दिवे, गियर ऑइल, केबल-वेगवेगळ्या आकाराचे | | | |

**दिनांक:** 07/12/2024
**स्थळ:** हिंगणघाट

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

**अधिकृत अधिकारी**
**पंजाब नॅशनल बँक**



**Chola** Enter a better life

**चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड**

कॉर्पोरेट कार्यालयः चोला क्रेस्ट, सुपर बी, सी 54 व सी 55, 4, थिरू वि का इंडस्ट्रीयल इस्टेट, गिंडी, चेन्नई - 600 032.

**ई-लिलाव विक्री सूचना (केवळ ई-बोलीच्या माध्यमातून विक्री)**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) व 8(6) अंतर्गत जारी करण्यात आलेली अचल अनामत मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

याद्वारे **स्तंभ (ए)** मध्ये नमूद कर्जदार व जामीनदार आणि सर्वांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या **स्तंभ (सी)** मधील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा **चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड,** सुरक्षित धनको, च्या प्राधिकृत अधिकारयांनी स्तंभ (डी) मध्ये नमूद केल्यानुसार रचनात्मकताबा घेतलेला असून तिची खाली नमूद तपशिलानुसार **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'', ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

याद्वारे **स्तंभ (ए)** मध्ये नमूद कर्जदार/गहाणकार/कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणकार (मयत) यांचे निष्पादक, प्रशासक, वारस व अभिहस्तांकिती यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(1) अंतर्गत सूचना देण्यात येत आहे.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको **चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड** च्या वेबसाईटवर म्हणजे **https://www.cholamandalam.com** आणि **www.auction-focus.in** येथे दिलेली लिंक पाहावी.

| अ. क्र. | [ए] खाते क्र., कर्जदाराचे/ जामीनदाराचे/ गहाणकाराचे नाव | [बी] वसूल करावयाची थकबाकी (सुरक्षित कर्जे) | [सी] अचल मालमत्ता / अनामत मत्तांचे वर्णन | [डी] ताब्याचा प्रकार | [ई आणि एफ] आरक्षित किंमत (रु.) / बयाणा रक्कम (रु.) | [जी] लिलाव दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कर्ज खाते क्र.: HL01ATI000006396 **1) अवधूत विठ्ठलराव ओकोलकर 2) अश्विनी अवधूत ओकोलकर दोघेही राहणार येथेः** जेवाड नगर, दस्तूर नगर, अमरावती, गोंडबाबा मंदिराजवळ, अमरावती- 444606. तसेच येथे -सदनिका क्र. 402, चौथा मजला, प्लॉट क्र. 7, स.क्र. 35/1, 28/3, मौजे जेवाड, प्रगणे बडनेरा, गजराज नगर, कृष्णा मंदिराजवळ, अमरावती इ 444607 | **05.12.2024 रोजी थकबाकी रु. 21,67,682/-** (रु. एकवीस लक्ष सदूसष्ट हजार सहाशे ब्याऐंशी फक्त) | अचल मालमत्ता, मौजे जेवाड, प्रगणे-बडनेरा, ता. जिल्हा अमरावती, शे. स.क्र. 28/3 आणि 35/1, लेआऊट परिवर्तीत प्लॉट एस.डी.ओ. अमरावती यांच्या आदेशानुसार, महसूल प्रकरण क्र. एन.ए.पी./34/जेवाड-62/1985-86 दिनांक 20.05.1987, यातील लेआऊट परिवर्तीत प्लॉट क्र. 7, सदर प्लॉटचे एकूण क्षेत्रफळ 4034 चौ.फू. (375 चौ.मी.) दिनांक 30/01/2018 रोजीच्या स.क्र. 345 या नोंदणी क्रमांक असलेल्या घोषणापत्राच्या आधारावर ताब्यात असलेले व मालकी असलेले, निवासी इमारत ''यशोधन अपार्टमेंट'' बांधलेली. तळ मजल्यावर कव्हर्ड पार्किंग असून पहिला मजला, दूसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला यांच्यावर प्रत्येकी 3 (तीन) निवासी सदनिका/ युनिट्स आहेत. त्यामुळे सदर इमारतीत एकूण 12(बारा) स्वतंत्र आणि स्वयंःसमाविष्ट स्वतंत्र युनिट / सदनिका असून **चतुःसीमाः** पूर्वेस- लेआऊट मधील सर्विस रोड, पश्चिमेस- लेआऊटमधील सर्विस लेन आणि त्यानंतर त्याच लेआऊट मधील प्लॉट क्र. 16 आणि 17, उत्तरेस- त्याच लेआऊट मधील प्लॉट क्र. 8, दक्षिणेस- त्याच लेआऊट मधील प्लॉट क्र. 6, **परिशिष्ट II** (मालमत्ता सदनिका क्षेत्रफळ) सदर स्कीम / अपार्टमेंट मधील, सदनिका क्र. 402 , इमारतीची दक्षिण बाजू, चौथा मजला, ''यशोधन अपार्टमेंट'', सदर जमिनीच्या प्लॉटवर बांधलेली, क्षेत्रफळ 31.51 चौ.मी., सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ 38.16 चौ.मी. यासह चौथ्या मजल्यावर 4.43%, 1 बेड रूम, लिविंग रूम, किचन ट्रॉली व कॅबिनेट बाथरूम सह पी.ओ.पी किचन, अंतर्गत रंगरंगोटी सह डब्ल्यू.सी., आणि 1 बाल्कनी, ''यशोधन अपार्टमेंट'' या इमारतीत आणि **चतुःसिमाः** पूर्वेस- सदनिका क्र. 401, पश्चिमेस- सदनिका क्र. 403, उत्तरेस- जिना आणि प्लॉट क्र. 6, दक्षिणेस-प्लॉट क्र. 8. | रचनात्मक ताबा रचनात्मक ताबा | **रु. 13,26,000/-** (रु. तेरा लक्ष सव्वीस हजार फक्त) / **रु. 1,32,600/-** (रु. एक लक्ष बत्तीस हजार सहाशे फक्त) | **23.12.2024 रोजी दु. 2.00 ते सायं 04.00** पर्यंत (यासह निविदा दस्तावेजातील अटींनुसार प्रत्येकी 5 मिनिटांचे स्वयं काल विस्तार) |
| 2 | कर्ज खाते क्र.: HL03ATI000003500 **1) श्री./श्रीमती प्रदीप रमेश गुप्ता 2) श्री./श्रीमती अल्पना प्रदीप गुप्ता दोघेही राहणार येथेः** द्वारे सचिन एस. दम्मानी, जनक रेसिडेंसी, यवतमाळ रोड जवळ, बडनेरा, अमरावती- 444601. तसेच येथे इ 304, जनक रेसिडेंसी, यवतमाळ रोड जवळ, बडनेरा, अमरावती इ 444701 | **05.12.2024 रोजी थकबाकी रु. 22,28,925/-** (रु. बावीस लक्ष अठ्ठावीस हजार नऊशे पंचवीस फक्त) | **परिशिष्ट I** (मालमत्ता प्लॉटचे क्षेत्रफळ जमीन लेआऊट प्लॉट क्र. 21, क्षेत्रफळ सुमारे 4986.42 चौ.फू. (463.25 चौ.फू.) आणि प्लॉट क्र. 22-ए, क्षेत्रफळ सुमारे 1463.90 चौ.फू. (136 चौ.फू.), एकूण क्षेत्रफळ सुमारे 6450.32 चौ.मी. (599.25 चौ.फू.), शेत सर्वे क्र. 188, मौजे-बडनेरा, ता. आणि जिल्हा अमरावती, सदनिका क्र. 304, दूसरा मजला, ''यश अपार्टमेंट'', सदर प्लॉटवर बांधलेली, सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ 50.65 चौ.मी. (545.19 चौ.फू.) यासह सदर जमिनीत अविभाजित हिस्सा, अमरावती महानगर पालिकेच्या हद्दीत. पूर्वेस- लेआऊट प्लॉट क्र. 36, दक्षिणेस- लेआऊट मधील 9 मी. रुंद रस्ता, पश्चिमेस- लेआऊट मधील 9 मी. रुंद रस्ता, उत्तरेस- लेआऊट मधील प्लॉट क्र. 22बी. | | **रु. 13,24,800/-** (रु. तेरा लक्ष चोवीस हजार आठशे फक्त) / **रु. 1,32,480/-** (रु. एक लक्ष बत्तीस हजार चारशे ऐंशी फक्त) | |

✦ **पाहणी दिनांकः 19.12.2024** ✦ **किमान बोली वृद्धी रक्कमः रु. 10,000/-.**

**बोली/बयाणा रक्कम/ सहभागाचे विनंती पत्र सादर करण्याचा शेवटचा दिनांक-20.12.202 सायं 5 पर्यंत.**

*सोबत भरणा आणि / किंवा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. सह कर्ज करारानुसार लागू असलेले पुढील व्याज.

मालमत्तेच्या पाहणीशी संबंधित मदतीसाठी, बोली दस्तावेज प्राप्त करण्यासाठी आणि इतर कोणत्याही चौकशीसाठी कृपया चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड चे अधिकारी **श्री राहुल जयसिंग हजारे यांचेशी मोबाईल क्र. 9763610679, ई-मेल आयडीः rahuljh@chola.murugappa.com / श्री मो. अब्दुल कावी, मोबा.क्र. 7305990872** यांचेशी संपर्क साधावा. **चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड** च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांवर कोणतेही बोजे नाहीत.

**दिनांकः 06.12.2024**
**स्थानःअमरावती, महाराष्ट्र**

**स्वा/-**
**प्राधिकृत अधिकारी,**
**चोलामंडलम इन्व्हेस्टमेन्ट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड करिता**